SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY
RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL

Email id : aiirjpramod@gmail.com

www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

# मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

आणि

विनायकराव पाटील शि. प्र. मं. सं.

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

**मराठी विभाग**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

(दि. १२ फेब्रुवारी २०२२)

( Special Issue No.105 )

**Chief Editor**

Mr. Pramod P. Tandale

**Co-Editor**

Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

HOD Marathi ,

Arts , Commerce and science College, Kannad

**ecutive Editor**

f. Dr. Sunita Shinde

cipal,

, Commerce and science College, Kannad

# विशेष मार्गदर्शन

**मा. किशोर पाटील**

अध्यक्ष, विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद.

**प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील**

अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

# संपादकीय सल्ला आणि मूल्यमापन समिती

डॉ. सतीश बडवे, औरंगाबाद

डॉ. केशव तुपे, अमरावती

डॉ. दत्ता घोलप, सोलापूर

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | भगवान काळे | १९९० नंतरची मराठी कथा : आशय आणि रूपबंधातील बदल | 1 |
| 2. | डॉ.गीता मांजरेकर आणि प्रा. आशा कुंभार | सतीश तांबे यांची कथा : कथनमीमांसेच्या आधारे विश्लेषण | 6 |
| 3. | डॉ. अर्चना काटकर – सोनवणे | समकालीन कथा लेखिकांच्या कथेची निवेदनव्यवस्था | 15 |
| 4. | प्रा. डॉ. गोपीनाथ पांडुरंग बोडखे | मराठी ग्रामीण कथेची भाषाशैली | 18 |
| 5. | प्रा. डॉ. शशिकांत पाटील | समकालीन मराठी कथेतील खानदेशी बोली भाषेचा वापर | 23 |
| 6. | डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने | जागतिकीकरणाच्या आवर्तात कथेची ससेहोलपट | 28 |
| 7. | प्रा. डॉ. दिलीप बिरुटे | जागतिकीकरणाच्या प्रभावातील समकालीन लेखकांचा अभ्यास | 31 |
| 8. | डॉ. सहदेव विलासराव रसाळ | जागतिकीकरण - बाजारीकरण - प्रसारमाध्यमे - नागरीकरण – भौतिकवाद यांनी प्रभावित केलेली समकालीन कथा | 34 |
| 9. | डॉ. रामहरी मधुकर सूर्यवंशी | जागतिकीकरण, बाजारीकरण, प्रसारमाध्यमे, नागरीकरण, भौतिकवाद यांनी प्रभावित केलेली समकालीन कथा : एक साहित्यिक अध्ययन | 38 |
| 10. | प्रा. डॉ. रामहारी मायकर | समकालीन साहित्य आणि समाज | 42 |
| 11. | डॉ. विठ्ठल केदारी | मराठी समकालीन कथेचा प्रवास | 45 |
| 12. | डॉ. रविकांत शिंदे | समकालीन मराठी कथेचे स्वरूप | 49 |
| 13. | डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर | समकालीन कथालेखक | 54 |
| 14. | डॉ. रमेश तु. देशमुख कवित्रा सिपु वळवी | समकालीन कथेतील प्रवृत्ती आणि प्रवाह | 61 |
| 15. | डॉ. सुभाष साहेबराव बागल | समकालीन कथेतील प्रवृत्ती व प्रवाह | 65 |
| 16. | प्रा. डॉ. अनिरुद्ध मोरे | समकालीन लेखिकांची कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह | 69 |

# समकालीन कथालेखक

- डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर
मराठी विभाग,
सहाय्यक प्राध्यापक,
लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,
परतूर, जिल्हा जालना.

समकालीन साहित्याविषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, "समकालीन साहित्य म्हणजे जे आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते. ज्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे. त्या काळातील विचार, जाणिवा, मते या साहित्यातून व्यक्त होतात."[१] समकालीन कथेत शेतकरी, बारा बलुतेदारांचे दारिद्रय, त्यांच्यातील सामाजिक, आर्थिक पातळीवरील परस्परावलंबित्व, कृषिव्यवस्थेत काळानुसार होत गेलेले बदल, राजकारण-सहकार-शिक्षण यामुळे ग्रामीण भागात सामाजिक, राजकीय व आर्थिक पातळीवर झालेली परिवर्तने इत्यादीचे वास्तव चित्रण आलेले आहे. समकालीन स्त्रियांच्या कथेत पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीच्या वाट्याला आलेले दुय्यम स्थान, कौटुंबिक व सामाजिक पातळीवर तिच्यावर होणारे अन्याय, 'चूल व मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित ठेवलेले तिचे विश्व, शिक्षित स्त्रियांना आलेले स्वत्वाचे भान इत्यादीचे चित्रण आले आहे.

साहित्याद्वारे सामाजिक वास्तवाचे भान ठेवून लेखक समकालातील वास्तव मांडतो. "एकाच काळात राहणारे एकाच वेळी अस्तित्वात घडत असलेले किंवा एकाच वेळेत अस्तित्वात जगत असलेले किंवा एकाच युगातील एकाच काळातील तसेच एकाच काळाशी निगडित किंवा एकाच काळातील व्यक्ती म्हणजे समकालीन होय."[२] लेखक आशयाच्या आविष्कारात वेगवेगळे प्रयोग करत साहित्यप्रकाराच्या रूढ चौकटीला आव्हान देतो. समकालीन साहित्य विविधांगी प्रश्नांच्या तळाशी जाऊन चर्चा करते. रुढ चौकट मोडून साहित्यिक नव्या जाणिवा मांडत असतो. तो भूतकाळाचा भविष्यकाळाशी धागा येथे जोडत असतो. वर्तमानकालीन जीवनानुभवाचा लेखकावर प्रभाव असल्याने तो नावीन्यपूर्ण आशय मांडत असतो. लेखक त्या समूह घटकाचे अनुभवविश्व सामाजिक जाणिवेतून मांडत असतो.

समकालीन साहित्याचा कालखंड प्रचंड उलथा-पालथीचा आहे. मानवी मूल्यांचा ऱ्हास हे मानव जातीला मोठे आव्हान होते. निशिकांत ठकार समकालीन साहित्याबाबत म्हणतात, "जे साहित्य आजही आपल्या स्पंदनशीलतेचा प्रत्यय देते, जे गतीशील आहे आणि जे कालस्वर ओळखते, त्यास समकालीन साहित्य म्हटले पाहिजे. मग ते परंपरेच्या पडद्यातून आलेले असो किंवा नवतेच्या नांदीतून आलेले साहित्य."[३] प्रारंभीची कथा मानवी स्वभाव, प्रसंग आणि अनुभवाच्या दृष्टीने साकारली होती. पुढील काळातील मराठी कथा परंपरेच्या साच्यातून मुक्त झाली. सामाजिक वास्तवाला प्राधान्य दिले. समकालीन कथासाहित्यात माणूस, त्याचे अनुभवविश्व व जीवनशैली या सर्वांचा समावेश होऊ लागला. याविषयी सतीश तांबे म्हणतात, "समकालीनामध्ये काही गोष्टी गतकालीन म्हणजे पारंपरिक ती काही काळाच्या पुढच्या तर काही सार्वत्रिक/त्रिकालाबाधित अशा असतात."[४] खेड्यात, महानगरीय समाजात एकाकीपण, असुरक्षितता, उदासीनता, भरकटलेपणा यासारखे नवेच प्रश्न नव्याने निर्माण झाले. याचेच पडसाद कथासाहित्यातून उमटू लागले.

मागील दोन दशकातील कथालेखकांनी मध्यमवर्गीयांच्या विश्वापलिकडचे विश्व कथेत साकार केले. कथातून वास्तवाची अपरिचित रूपे दाखवली. खाउजामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वाचे प्रश्न निर्माण झाले. या संस्कृतीमुळे महानगरात यांत्रिकीकरणाचा प्रभाव व ग्रामीण संस्कृतीवर महानगरीय संस्कृतीची छाप पडलेली दिसते. यामुळे समाजातही अस्वस्थता वाढत होती, आहे. मानवी मनाला एक प्रकारचा बकालपणा आलेला होता, आलेला आहे. सत्ता संघर्षाची प्रवृत्तीही बळावत गेली, बळावते आहे. समाज जीवनात निर्माण झालेले प्रश्न, माणसातील मत्सरी वृत्ती, राजकारणातील डावपेच, खुनशी वृत्ती, स्त्रियांचे प्रश्न, कृषी जीवनातील प्रश्न, आणि गावगाड्यातील पेचप्रसंग अशा वैविध्यपूर्ण घटनांचे वास्तवदर्शी चित्रण कथा साहित्यातून आले.

यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली आलेले मानवी जीवन, यंत्रामुळे वाढत जाणारी बेरोजगारी, हिंसाचाराकडे वळणारे तरुण, भ्रष्टाचाराचे वाढलेले साम्राज्य, स्वार्थाने बरबटलेले राजकारण यासारख्या प्रश्नांचे चित्रण समकालीन कथा साहित्यातून अविष्कृत झाले.

या कथेत मनोविश्लेषणाला आणि सामाजिक वास्तवाला प्राधान्य दिले आहे. कथेत विविध प्रतिमा-प्रतिकांचा वापर होऊ लागला. शब्दनिवड, शैली, निसर्गाची प्रतीके या सर्वांच्या वापराने कथेत वेगळेपणा आला. यामुळे समकालीन कथा आशयदृष्ट्या सरस बनली. या कथेच्या स्वरूपाविषयी गंगाधर गाडगीळ म्हणतात, "नवकथेच्या लेखकांनी कलेच्या क्षेत्रातील अनेक संकेत झुगारून दिले आहेत. हेच तिचे मोठे वैशिष्ट्ये. त्यांचा पहिला संकेत हा कथेच्या विषयासंबंधी अनेक अनुभव हे कथांचे विषय होऊ लागले व दुसरा संकेत झुगारला तो भावनाविवश जनतेचा प्रत्येक अनुभव अर्थपूर्ण करायचा असेल व कलात्मक पातळीवर न्यायचा असेल तर भावनांच्या आवेगात त्याला बोलून काढलाच पाहिजे असे त्यांना वाटत नाही."[५] गाडगीळांचे हे मत कथेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. नवकथाकारांनी नवकथेत अनेक प्रयोग केले. निवेदनाच्या अनेक पद्धती हाताळल्यात. भाषाशैलीचा वापर अचूकपणे केला आहे. माणसाचा एकाकीपणा हा बहुतेक कथांचा विषय बनला आहे. माणूस हा त्याच्या मनातील व समाजातील गूढ शक्तीचा तो दास बनला आहे. या सत्याचा अविष्कार या कथेतून घडला आहे.

आसाराम लोमटे, किरण गुरव, जी.के.ऐनापुरे, मिलिंद बोकील, समर खडस, नीरजा, प्रतिमा जोशी, किरण येवले, मोनिका गजेंद्रगडकर, सदानंद देशमुख, बालाजी सुतार, शिल्पा कांबळे, प्रणव सखदेव, गुप्ते या नवकथाकारांनी आपल्या कथांमधून उद्ध्वस्त झालेली ग्रामव्यवस्था, राजकारणातील स्थित्यंतरे, शहराकडे धावणारा खेड्यातील माणूस यामुळे उद्ध्वस्त होत चाललेली कृषिसंस्कृती. बदललेला गावगाडा, यांत्रिकीकरणाचा परिणाम, सुशिक्षितांचे तुटलेपण असे अनेक गंभीर विषय कथेतून मांडले. ग्रामीण जीवनाचा केंद्रबिंदू असणारी स्त्री आणि तिचे कष्टमय जीवन यांचा वेध कथाकारांनी घेतला आहे. ग्रामीण स्त्री म्हणजे अनेक प्रश्नांनी - समस्यांनी गांजलेली. कष्टाळू, संसारासाठी झटणारी अशी आहे. तिच्या वाट्याला येणारे कष्टाचे जीवन आणि त्यातही सर्वकाही सोसण्याची तिची झालेली मानसिकता यांचे चित्रण कथांमधून येते.

इ. स. २००० नंतरची समकालीन ग्रामीण कथा अस्मानी आणि मानवी संकटाचे वास्तव मांडते. बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, स्त्रियांचे लैंगिक शोषण, पर्यावरण प्रदूषण, चंगळवाद अशा अनेक समस्यांनी आजचा समाज ग्रासलेला आहे. याचे चित्रण कथासाहित्यातून कथाकारांनी मांडले आहे. तसेच प्रसारमाध्यमांचा समाज मनावरील वाढत जाणारा पगडा, यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. प्रसारमाध्यमांनी जग जवळ आले; पण माणसे एकमेकांपासून दूर गेली. शेअर बाजाराचे वाढते प्रमाण, नोकरशाहीला अकारण महत्त्व, शेती करण्याकडे कमी लक्ष, औद्योगिक क्रांतीमुळे पर्यावरणाचे संतुलन ढासळले. ढासळती नीतिमत्ता भोगवादीवृत्ती, स्वयंकेंद्रितता, सामाजिक विकासाची उदासीनता अशी अनेक स्थित्यंतरे घडत गेली, घडत आहेत.

आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड केले आपल्या वेदना व व्यथा साहित्यातून मांडल्या, परखड शब्दातून विद्रोह व्यक्त केला. साहित्यिकांनी वैचारिक संघर्ष आपल्या लेखणीतून मांडला. समकालीन कालखंडातील साहित्य सर्वांच्या मनाला भिडणारे आणि अस्तित्वाचे भान आणून देणारे ठरले.

ग्रामीण जीवनात आधुनिकतेचे वारे वाहू लागले. भौतिक सोयीसुविधांबरोबर सुधारणा आल्या. गावातील पारंपरिक संस्कृती बदलत गेली. एवढेच नाही तर शेतीपूरक व्यवसायावरही गंडांतर आले. एवढ्यावरच हे थांबले नाही. गावात राजकारण आले. निवडणुका आल्या. त्यानंतर समाजात ताण - तणाव, गट निर्माण झाले. त्याचा परिणाम म्हणून खून - मारामाऱ्या आणि पिढ्यान्‌पिढ्यांचे वैर निर्माण झाले. गावाची शांतता भंग पावली. यात भरडला जाऊ लागला सामान्य माणूस. त्याचे मोठ्या प्रमाणावर शोषण होऊ लागले. शेतकरी कर्जबाजारी झाला. त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली. त्याच्या जगण्याचे अनेक प्रश्न निर्माण झाले. याचे प्रतिबिंब ग्रामीण कथेतून उमटू लागले.

इ. स. २००० नंतरच्या मराठी कथेचा विचार करताना जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या जटील, भयावह समस्यांना दुर्लक्षून चालत नाही. जागतिकीकरणामुळे भारतीय समाज - सांस्कृतिक प्रारुपात मूलगामी बदल झाले. बाजार आणि वस्तूकरणाला महत्त्व प्राप्त झाले. शोषणाच्या नव्या शृंखला तयार झाल्या. जागतिकीकरणातून आकाराला आलेल्या नवभांडवलदार रचनेचे ध्रुवीकरण झाले. शोषित, कष्टकरी, शेतकरी वर्ग यामध्ये भरडला गेला. ग्रामीण आणि नागर जीवनाच्या सीमारेषा धूसर झाल्या. नवे पेच निर्माण झाले. महानगरातील कष्टकरी सामान्य माणसाचा या आक्रमणासमोर निभाव लागला नाही. याच काळात जातीय,

धार्मिक अस्मिता अधिक बळकट झाल्या. गावगाड्यातील कृषिजनसंस्कृतीशी निगडित अनेक नव्या समस्या उभ्या राहिल्या. ग्रामीण भागात झालेल्या राजकारणाच्या शिरकावाने गावाच्या एकसंधपणाला तडे गेले. स्त्री - पुरुष नातेसंबंधात नवे ताण निर्माण झाले.

आजची कथा जीवनानुभवाची विविध क्षेत्रे शोधते आहे. उपरोक्त कथाकारांनी मराठी कथेला नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. सर्वसामान्य माणसाचे जगणे केंद्रवर्ती ठेवत त्याच्या जगण्यातील विविध परिमितीचे, सूक्ष्म कंगोऱ्यांचे अनेकपदरी दर्शन त्यांनी घडविलेले आहे. या लेखकांनी कथेविषयीच्या पूर्वसमजुतींना ओलांडत नवी जाण प्रस्तुत केली आहे. त्यांचे कथालेखनही अधिकतर दीर्घत्वाकडे झुकणारे आहे. दीर्घकथेचा रुपबंध स्वीकारल्याने त्यांना वर्तमानातील गुंतागुंत, जटिलता कवेत घेता आली आहे. एकापेक्षा अधिक पात्रे केंद्रस्थानी ठेवत वेगवेगळे आवाज पृष्ठस्तरावर आणणे शक्य झालेले आहे.

दीर्घकथेचा स्वतंत्र बाज, आविष्कारणाची वेगळी रीत विकसित झाली आहे. अपेक्षित परिणामासाठी रूपाची ही घडण फायदेशीर ठरली आहे. नेमाडेंची कथेविषयीची विधाने सकारात्मक अर्थाने आजच्या मराठी कथेला बळ पुरवणारी ठरत आहेत. या काळातील कथालेखक बहुविध आशयसूत्रे, त्यातील अंतर्विरोध नेमकेपणाने मांडत कथालेखनाचे एक नवे रचित साकारत आहेत. वरवरचे वास्तव मांडण्यापेक्षा खोलवरचे गर्भित सूचन करण्याकडे त्यांचा कल आहे. धर्म, जात, लिंग, प्रदेश अशा अस्मिताकेंद्री गोष्टींची दाट छाया पसरलेल्या आजच्या काळाची वस्तुनिष्ठ चिकित्सा करण्याचे काम या लेखकांनी केलेले आहे. शोषित, वंचित, कष्टकरी वर्ग सातत्याने त्यांच्या कथेतून अवतीर्ण झालेला आहे. स्त्री-पुरुष नातेसंबंधाकडेही बदलत्या कालभानाच्या आणि मूल्यभानाच्या परिप्रेक्ष्यातून त्यांनी पाहिले आहे.

**जयंत पवार** : या काळाचे समर्थ कथाकार म्हणून पवार यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. मराठी कथेच्या कक्षा रुंदावण्यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. महानगरातील पालटलेल्या स्थितीगतीचा, सामान्य माणसाच्या विस्थापनाचा, कष्टकरी कामगारांच्या समूह मानसिकतेचा तळठाव त्यांची कथा घेते. वास्तव आणि कल्पिताचा खेळ उभा करत पृष्ठस्तरीय अनुभवद्रव्याचे अनेक कंगोरे त्यांनी उजागर केलेले आहेत. कथनाचे सातत्याने प्रयोग केले. यामुळे त्यांना एकापेक्षा जास्त पात्रांचे जीवनानुभव कथेच्या संरचनेत मुरवता आले. या वैविध्यामुळे त्यांची कथा बहुपदरी झाली.

**आसाराम लोमटे** : शेतकऱ्यांचे-ग्रामीण भागाचे प्रश्न साहित्यिक पातळीवर मागील दोन दशकापासून अनेक लेखकांच्या साहित्यकृतींमधून ही अस्वस्थता मांडली गेली; पण आसाराम लोमटे यांचे वेगळेपण हे की त्यांनी ही अस्वस्थतेची 'धूळपेरणी' करत असताना समकालीन बदलत्या संदर्भांना अधिक ठळकपणे मांडले. आसाराम लोमटे यांच्या कथासृष्टीत काळबदलाचे मूल्यात्म भान आहे. दोन पिढ्यांमधील अंतर, गतिमान विकास आणि मूल्यऱ्हास यामधील ताणाचे पडसाद त्यांच्या कथेत आहेत. शेतकरी आंदोलने, शेतीसमोरील आव्हाने, गावगाड्यातील प्रभुत्वसंबंध, अवर्षणग्रस्तता, स्त्रीशोषण, राजकारण अशा अनेक प्रश्नांना पृष्ठस्तरावर आणत त्यामागील कार्यरत व्यवस्थांची चिकित्सा करण्याचे काम त्यांची कथा करते. ग्रामीण बोलीतील ओघवत्या कथनशैलीतून सजीव असे कथाशिल्प त्यांनी घडविले आहे. त्यामुळेच 'इडा पीडा टळो' आणि 'आलोक' हे त्यांचे दोन कथासंग्रह चर्चेचा विषय ठरले. दुष्काळ आणि सरकारी अनास्थेमध्ये होरपळणाऱ्या मराठवाड्यातील गावोगावच्या व्यथा आता माध्यमांमुळे पुणे मुंबईच्या वेशीवर पोचल्या आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आता येथेही चर्चेचा विषय ठरतात; पण माध्यमांच्याही आधी लोमटे जवळून अभ्यासत होते, त्यावर लिहितही होते. साहित्य संमेलन, चर्चासत्रे, परिसंवाद यात त्यांनी नेहमीच गावांच्या व्यथा मांडल्या.

त्यांच्या 'आलोक' कथासंग्रहात एकूण सहा कथा आहेत. सगळ्याच कथा लयीत, लहानसहान तपशील टिपत पुढे जाणाऱ्या आहेत. त्यातील कथानक सूक्ष्म पातळीवर उलगडते. 'चिरेबंद', 'ओझं', 'खुंदळण' या तीनही कथांच्या केंद्रस्थानी असलेल्या घटना कथा सुरू होतात त्या आधीच घडून गेलेल्या आहेत. प्रत्यक्ष कथांमध्ये त्या घटनांचे पडसाद, प्रतिक्रिया, त्यात गुंतलेल्या पात्रांची त्यावरची विचारांची घुसळण, परिणामस्वरूप परिस्थितीने घेतलेले एक वळण, असा ओघ आहे. पण वाचताना आपल्या डोक्यात एकीकडे ती आधीच घडून गेलेली घटना कशी असेल, तेव्हाचे वातावरण कसे असेल, आता समोर व्यक्त होणारी पात्रे तेव्हा कशी वागली असतील, याचे एक चित्र लेखक उभे करीत राहतो. 'चिरेबंद' कथेत गावातील सावकार, त्याचा मोठा जुना वाडा, त्याच्या मृत्यूनंतर तिथे एकटीच राहणारी त्याची बायको, तिथे अधूनमधून येणारा तिचा नातू, सावकाराने सावकारीला जोडून केलेले अपहार असे बहुतांशी भूतकाळाचे संदर्भ आहेत. त्यात 'चिरेबंद' काय आहे याचा सतत शोध घेतला जातो. कथा संपते, शेवटी तो शोधही संपतो.

'ओझं' आणि 'खुंदळण' कथांमध्ये याउलट होते. कथांच्या सुरूवातीलाच शीर्षकांचे आणि कथानकाचे नाते लक्षात येते. कथेच्या कोणत्याही टप्प्यावर शीर्षकाने सुरूवातीलाच आखून दिलेल्या रेषेपासून कथानक जराही ढळत नाही. 'ओझं' कथा वाचकाच्या मनावर ओझं ठेवत जाते. गेल्या काही वर्षांत ग्रामीण पार्श्वभूमी आणि दुष्काळ यांचे अतुट नाते तयार झाले आहे. या कथेचे कथानक दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्येवर आधारलेले आहे. यातील या प्रकारची ही एकमेव कथा; पण ती येते आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या धाकट्या भावाच्या निवेदनातून आणि या कथेत कारुण्य येते ते बोचऱ्या वास्तवाचे बोट धरून. 'खुंदळण' कथा ग्रामीण राजकारणाला केंद्रस्थानी ठेवते. कथेत दर्शवलेली तळागाळातील राजकीय कार्यकर्त्यांची कुतर ओढ, दोलायमान मन:स्थिती, परिस्थितीशरणता इतकी प्रभावी आहे, की वाचक त्या राजकारणापासून शतपावले दूर असेल तरीही कथा वाचताना त्या कार्यकर्त्याला कधी चूक तर कधी बरोबर ठरवतो. त्याच्या बरोबरीने मनही हेलकावे खात राहते. त्या कार्यकर्त्याच्या दोलायमान मन:स्थितीला 'कोणता झेंडा घेऊ हाती ?' ची लय आहे; मात्र त्यावर बोलताना राजकारणातील व्यक्तिनिष्ठतेवर अधिक भर दिला गेला आहे. त्यामुळे कथेत राजकारण केंद्रस्थानी असले तरी वरचढ ठरत नाही; ते त्या कार्यकर्त्याच्या मनातील घालमेल अधिक गडद करते.

वेगाने होत असलेल्या परिवर्तनात ग्रामीण आणि शहरी जीवनातील सीमारेषा धुसर होत चालली आहे. नेमका हाच धागा पकडून ग्रामीण भागातील जीवन लेखनबद्ध करण्याचा प्रयत्न लोमटेंनी केला आहे. 'जीत' ही राजकारणाची पार्श्वभूमी असलेली आणखी एक कथा आहे; मात्र 'खुंदळण'हून पूर्ण वेगळी.

भर उन्हात झाडांच्या बुंध्याभोवतीची कोरडी माती बोटांनी बाजूला केली तर ती सहज बाजूला होते. नंतर खालची माती थोडी ओली असल्याचे दिसते. त्या ओल्या कोंदट मातीचा गारवा बोटांना जाणवतो. ती ओली माती सहजपणे सरकत नाही. पण तो हवाहवासा वाटणारा गारवा, ओल्या मातीचा ओला वास सोडवतही नाही. लोमटे यांच्या कथा तो ओलावा वाचकांपुढे ठेवतात. हा 'ओलावा' म्हणजे पात्रांमधील माया-ममता, प्रेम-जिव्हाळा असे सगळे मंगल असेलच असे नाही. माणसाचे माणूस असणे, त्याच्या स्वभावातील बरे - वाईट अनुभव, परिस्थितीनुरूप त्याची वागणूक, हे संपूर्ण त्यात येते. ग्रामीण भोवतालातील माणूस कसा घडतो-बिघडतो ते त्यातून दिसते. हे बिघडणे लौकिकार्थाने बिघडणे नसते; तो जगण्याच्या, तगून राहण्याच्या आटापिट्यातील एक भाग असतो.

'कुभांड' कथेत मध्यमवयीन मालीपाटलाचा हाच आटापिटा कथेला व्यापून राहतो. 'कुभांड' या शब्दावरून एखादी सनसनाटी, खळबळजनक घटना कल्पिली जाऊ शकते; पण कथेतील कुभांड व्यक्ती-व्यक्तितील चढाओढीचे, आटापिट्याचे प्रतीक आहे. त्यापायी वरकरणी मालीपाटलाच्या गावातील वातावरण काही काळापुरते ढवळले जाते. पण त्यातून त्याला एक वर्चस्ववादी विधान करायचे असते, त्यात तो यशस्वी होतो. त्या विधानाची पद्धतशीर आणि बेरकी आखणी म्हणजे 'कुभांड'.

'वळण' शाब्दिक 'वळणा'वर घडलेली एक घटना, त्या घटनेची साक्षीदार ठरलेली एक शाळकरी मुलगी; साक्षीदार म्हटले तरी तिने ती घटना अगदी समोर ढळढळीत पाहिलेली नाही; तरी त्या घटनेमुळे तिच्या आयुष्याला कोणतं 'वळण' लागते हे सांगणारी ही कथा. अत्यंत चित्रदर्शी. अतिशय प्रभावी. शाब्दिक वळणापासूनच्या त्या मुलीच्या वाटचालीत वाचक पावलापावलावर तिच्या साथीने जे चालायला लागतो, तो थेट कथेच्या शेवटी वळणाच्या भावार्थाजवळ येऊनच थांबतो.

समाजव्यवस्थेत होरपळून निघालेल्या सर्वसामान्य जनतेचे सुख, दु:ख, आशा, स्वप्न आपल्या साहित्याच्या माध्यमातून लोमटे मांडतात. दुर्लक्षितांचे जगणे हीच आपल्या लेखनाची प्रेरणा असल्याचे ते सांगतात.

**किरण गुरव** : गावपरिसरातील बदलाची चित्रे वेगळ्या संवेदनदृष्टीतून गुरव चित्रित करतात. भाबडा रोमँटिकपणा, रजंकता, प्रादेशिकता अशा सापळ्यात अडकलेल्या ग्रामीण कथेला समष्टीच्या, जीवनदर्शनाच्या पातळीवर नेण्याचे काम या कथाकारांनी केले. त्यांनी कथेत बाईपणाच्या दु:खाच्या अनेकमीती साकारल्या आहेत. गावगाड्यातील बाईच्या मनोव्यापाराची सूक्ष्म निरीक्षणे नोंदवली आहेत. तसेच नवशिक्षित तरुणांच्या धडपडीचे, बेकारीचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेत आहे. नोकरी अभावी छोटे व्यवसाय सुरू करणाऱ्या तरुणांच्या स्वप्नाकांक्षा नवभांडवली जगाच्या आक्रमणात धुळीस मिळतात. या तरुणांच्या शिकण्याच्या, संघर्षाच्या, स्थित्यंतराच्या अनेक कहाण्या गुरवांनी साकारल्या आहेत. भौतिक अवकाशाच्या शिरकावामुळे ग्राम अवकाशाचा बदललेला चेहराही त्यांनी ताण्याबाण्यासह साकारलेला आहे. अलंकृत भाषेचा वापर करूनही त्यांच्या भाषेतील नैसर्गिक सहजता कुठेही उसवत नाही.

**समर खडस** : यांची कथा ही महानगरीय अवकाशासंदर्भात असली तरी ती धार्मिकता, स्त्री-पुरुष संबंध, राजकारण, हिंसा, क्रौर्याचे विदारक दर्शन घडविते. आपल्या कथांच्या शेवटी ज्या सत्याकडे ते नेतात, ते क्रौर्याने भारलेले असते. त्यांच्या कथेतील मानवी हिंस्त्र दर्शनाने रूढ वाचकाला असांकेतिकतेचे धक्के बसतात. अतिशय प्रवाही, उत्कंठावर्धक आणि बेधडक शब्दबंधातून त्यांनी समकालीन समाजवास्तवाची केलेली चिकित्सा ही समाजचिकित्सेचा नमुनादर्श आहे.

**बालाजी सुतार** : हे समकालीन लिहित्या लेखकांमधील एक महत्त्वाचे नाव. 'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' हा बालाजी सुतार यांचा कथासंग्रह. विसावे आणि एकविसावे शतक जोडणाऱ्या पंचवीस वर्षांमधील कथालेखनाचा काळ. या काळात जगात उलथापालथ झालीच, भारतातही खूप बदल झाले. खासगीकरण, उदारीकरण, आणि जागतिकीकरण झाले. सोबत तंत्रज्ञान फार वेगाने आले. संगणकाकडे नवलाईने पाहणारी माणसे मोबाईल सहजतेने हाताळायला लागली, इंटरनेट वापरून वेबवर स्वार व्हायला लागली. जगण्याच्या नव्या पद्धती समजून घ्यायला लागली. बाजारीकरणाला सरावली. शहराप्रमाणे निमशहरी भागातही या सगळ्या बदला ंचे पडसाद उमटले. माणसे अस्वस्थ झाली, 'विच्छिन्न भोवतालचे संदर्भ' या कथेत 'सतत येणाऱ्या बध ीर कंटाळ्याचे काय करावे हे त्याला नीट उमगत नाही, एवढीच त्याची गोची आहे'. अशी गोची झालेली पात्रे या कथांमधून भेटतात. सुतारांचे कसब, की ते या पात्रांच्या आयुष्यातील नेमके टिपून वाचकांसमोर मांडतात.

'डहूळ डोहातले भोवरे' मधील हरिश्चंद्र एका विचित्र परिस्थितीतून जात आहे. एका बाईच्या आत्महत्येनंतर तो आपले हतबल आयुष्य तपासून पाहतो. 'राख झाल्या चितेचे तपशील शोधण्यात नंतर काय हाशील होते ?' हा प्रश्न सतावत असताना तो आपल्या परीने एक उपाय काढू पाहतो. यातील शांताराम, व्यंकटी ही पात्रे नेमकी उभी राहिली आहेत आणि या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर हरिश्चंद्रचा डहूळला डोह आपल्या मनातही कुठकुठले प्रश्न उमटवून जातो.

सोशल मीडिया, त्यातील आभासी जग आणि तेथील फसवी-तात्पुरती नाती हा विषय अलीकडे अनेक कथाकारांना खुणावतोय. त्यातील फोलपणा ते आपल्या पद्धतीने शोधतायेत. त्या प्रकारची संग्रहातील कथा 'निळ्या चमकदार काळोखातले अप-डाऊन्स'. संगणकाच्या निळसर चमकदार पडद्यामागचे जग निवेदिकेच्या आयुष्यात एक विचलितपणा आणते. थोड्या काळापुरती. स्त्री-पुरुष नात्यांचा आदिम अर्थ कायम तोच असतो का, याचा निर्देश त्यात आहे. पण एक सर्वसामान्य स्त्री हेही शांतपणे पचवून पुढे जाते, हे विशेष लक्षात घेण्यासारखे आहे.

अस्वस्थ, नव्या काळाला जुळवून घेण्याच्या प्रयत्नात, स्वत:ची कोणतीही निश्चित ओळख सापडत नसणारे असे एक वेगळे विश्व सुतार यांच्या लेखनात आहे. निमशहरी - शहरातील अपरिचित भागातील माणसांचे. तंत्रज्ञान तिथे पोहचलंय, बातम्या आणि इतर माहिती, व्हिडिओचे जग हाताशी आहे. आयुष्यातील अपरिहार्य घटना, तडजोडी निमूट घेतल्या जात आहेत. पण त्याच वेळी एक बिनकामाचा निवांतपणा आहे आणि त्याचे काय करायचे हे निश्चित नसल्यासारखी ही माणसे रोजच्या आयुष्यात काही अर्थ शोधू पाहत आहेत. 'विच्छिन्न भोवतालचे संदर्भ'मधील राघव एका कम्प्युटर सेंटरवर नोकरी करणारा. फारसे काही न घडणारे आयुष्य, त्यातील काही माणसांच्या आतील दु:खाशी आपले दु:ख उगीचच ताडून पाहणारा. ज्या काळाविषयी हा संग्रह आहे, त्यावर जास्त न बोलता भाष्य करणारी ही कथा आहे.

साहित्याचे जग खूप भावत आहे, कविता करणे सुरू आहे, पण त्या स्वप्नवत जगात शिरताना वास्तव जग इतके सहज नाही सोडता येत, हे 'दोन जगातला कवी' या कथेत अत्यंत प्रभावीपणे आले आहे. या कथेतील कवीसंमेलनाचा माहोल, सादरीकरणावरून राजाचा उद्वेग, तिथले श्रोते आणि कवी, कवितेवरची चर्चा, त्याच वेळी आपली इतर कर्तव्य े सांभाळण्याची राजाची तगमग प्रचंड जिवंतपणे आली आहे.

'दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी' या कथेचा कालावधी मोठा आहे. एकूणच कॅनव्हासदेखील बरेच काही कवेत घेणारा. २००८ मधील पाण्याच्या प्रश्नावरचे राजकारण आणि गावपातळीवरचे समाजकारण. नंतर २०१३ मध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागचे अर्थकारण, आणि २०१७ मधील हलवून टाकणारी टिपणे. रूढार्थाने कथा नसलेल्या या नोंदी एका संवेदनशील मनाने टिपलेल्या आहेत. बालाजी सुतार यांच्या लेखनात एक वेगळेच सामर्थ्य जाणवते.

शिक्षणक्षेत्रातील बजबजप ुरी, तिने निर्माण केलेले उच्चशिक्षितांचे चमत्कारिक प्रश्न हे आजचे वास्तव. विशेषत: शिकून चांगली नोकरी करून कुटुंबाला गरिबीतून वर काढण्याच्या उद्देशाने कष्ट करून कष्टाने घेतलेले शिक्षण आणि त्याची प्रत्यक्षातील किंमत हे प्रखरतेने दिसते, ते तालुका किंवा निमशहरी पातळीवर. सोबतच आज पैशांचे साधन बनलेल्या शिक्षणसंस्था आणि स्पर्धा

परीक्षा केंद्रे हे 'पराभवाच्या बखरीतली काही पानं' या कथेतून समोरे येते. धर्म, जातीयता, पैसा, सत्तेच्या अमर्याद वापराखाली भरडले जाणारे, कोणत्याही कामाला जुंपलेले शिक्षक-प्राध्यापक, स्त्री-पुरुष संबंधांमध्ये एकीकडे येत चाललेला मोकळेपणा, पण दुसरीकडे न टाळता येणारे गावकुसातले पारंपरिक आयुष्य अशा पार्श्वभूमीवर निवेदकाची पराभूत आणि भ्रमनिरास झालेली स्थिती विलक्षण विदारकतेने येते.

'अमानवाच्या जात्यातला पाळू' या कथेत तालुक्याचा गाव आहे. त्यात जातीय ध्रुवीकरण आहे. तेथील करीमनगर वस्तीतील अनुबाई ही उद्योगी स्त्री करीमभाईच्या मुलास धरून आहे. कथेला वस्तीतील अनेक गोष्टींचे पदर आहेत, पुढे या मुलाच्या मृत्यूनंतर आणि तिच्या निष्क्रिय नवऱ्याच्या मृत्यूनंतर वस्तीपलीकडील जगाचे. पुरुषाची नजर ओळखून राहणारी अनुबाई पुन्हा पुन्हा त्याच नजरेच्या परिघात येत राहते. पुढे तर जातीधर्माच्या राजकारणात एक प्यादं होऊन. ही समस्या नवी नाही, पण येथील संयत हाताळणी अस्सल आहे. एकूणच सुतारांचे लेखन कमालीचा काटेकोरपणे संयम राखून आहे, हेच त्यांचे बलस्थान आहे.

थिजलेल्या निरुद्देश आयुष्याचे संदर्भ वारंवार आले तरी या कथा निराशावादी सूर काढत नाहीत. तिथे राजकारण आणि समाजजीवन आहे, तसे स्वीकारलेले दिसते. माणसे बंड करून उठत नसली तरी आयुष्य पूर्ण फोलदेखील नाही मानतात. कधीतरी घेतलेला शकूचा रसरशीत अनुभव आठवत राहणारा 'पराभवाच्या बखरीतली काही पानं'मधील निवेदक आयुष्यातील पोकळ्या समजतो.

'संधिकाळातले जहरी प्रहर' कथेतील निवेदक बऱ्यापैकी निरुत्साहात आहे, काहीच बदलत नाही या संभ्रमात आहे. नव्या शतकाच्या पहाटेदेखील त्याला फार काही वाटत नाही. हीच या संग्रहाची निदर्शक संकल्पना म्हणावी लागेल. या संग्रहातील आठ कथा अतिशय वेगवेगळे विषय कौशल्याने हाताळणाऱ्या पण तरीही एका धाग्यात बांधता येतील अशा, संक्रमणाचा काळ आणि त्यातील बदलती नाती यांच्या संदर्भात माणसांचे आजचे आयुष्य तपासणाऱ्या आहेत. या बदलत्या काळात स्त्री - पुरुष संबंधांचे बदलते आयाम, त्यांचे डळमळते समीकरण, यासोबत एकूणच एकमेकांना जोखून बघणारी नाती आहेत. अगदी मित्रा - मित्रांमधील अलिप्तपणा आणि कोरडेपणा जाणवणारा, हात राखून जेवढ्यास तेवढे संबंध हीच बहुधा या काळाची लक्षणीय ओळख. ही गोंधळवणारी , सैरभैर करणारी आहे.

या कथा आजच्या डोळस लेखकाच्या आहेत. लेखनात प्रयोग करण्यासाठी लागणारी सर्जनशीलता त्याच्याकडे आहे. पण लेखकाला जे सांगायचं आहे ते प्रयोगांमध्ये कुठेच झाकोळून जात नाही हे विशेष. केवळ प्रयोगात अडकून राहणे टाळणारी वस्तुनिष्ठता असल्याने सुतारांच्या कथा आश्वासक ठरतात. शीर्षक अस्वस्थ करणारे नसले तरी दोन शतकांच्या मध्यावरचा तो सांधा आणि त्यावरची माणसे अस्वस्थ आहेत. सूक्ष्म निरीक्षण आणि ताकदीने मांडणी दिसून येणारे हे लेखन वाचकालाही अस्वस्थ करून सोडते.

**किरण येवले :** यांनी 'मोराची बायको आणि तिसरा डुळा' या संग्रहातून स्त्री-पुरुष नातेसंबंधाच्या विविध परी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री-पुरुष संबंधातील कुतूहलजन्य, नाजूक प्रश्नांना त्यांनी कथारचनेच्या केंद्रस्थानी आणले आहे. महानगरीय जगण्यातील गुंते, ताणेबाणे, अस्वस्थता, तगमग आणि या सर्वांना वेढून येणाऱ्या लिंगभावाचे वेगळे असे विश्व येवलेंच्या कथेत आहे. त्यांची कथा पिचलेल्या, दबलेल्या लोकांच्या वेदनेलाही मुखर करते. अतिशय काव्यात्म, संवादी शैलीतून त्यांनी अनुभवद्रव्याला सुसंघटित आकार दिला आहे.

**प्रणव सखदेव :** तरुण लेखकांमध्ये प्रणव सखदेव यांचे नाव घेतले जाते. 'पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता' हा कवितासंग्रह, 'निळ्या दाताची दंतकथा', 'नाभितून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य' हे कथासंग्रह. समकालातील प्रश्नांना भिडणे हे त्यांना महत्त्वाचे वाटते. आजच्या तरुणांची मानसिकता, त्यांचे प्रश्न, विखंडित जगणे व तंत्रज्ञानाचा वाढता वापर या सगळ्याचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनात पडलेले दिसून येते.

**मोनिका गजेंद्रगडकर :** 'भूप' आणि 'आर्त' हे त्यांचे दोन गाजलेले कथासंग्रह. 'आर्त' कथासंग्रहातून त्यांनी वेगवेगळ्या स्तरातील माणसांच्या जगण्यातील विकलता समोर आणली आहे. सूचक, संयत आणि अकृत्रिम शैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. व्याकुळता हीच त्यांच्या कथांचा गाभा आणि सौंदर्य ठरले आहे तर 'भूप' या पहिल्याच वेचक दीर्घकथांच्या संग्रहात लेखिकेने नातेसंबंधांचा विविध अंगांनी वेध घेतला आहे.

'आर्त' हा कथासंग्रह शीर्षकाप्रमाणेच आर्त अनुभव देतो. श्रद्धा, बाबाची आई, रुट्स, संक्रमण, नातं आणि जन्म या सहा कथांमधून जगण्याचे अनेक कंगोरे उलगडत जातात. ही सगळी माणसे वेगवेगळ्या पातळ्यांवरची आहेत. त्यांचे जगणे, त्यांचे प्रश्न वेगळे वाटतात; पण जगण्याची आर्तता एकच आहे. यशोदा, सय्यद, राधा, चारू, बाबा, श्रीदादा, असोत वा सत्यजितसारखा मनस्वी कलाकार हे सगळेच जण आपापल्या वाट्याला आलेले आयुष्य जगताहेत. मात्र, या सगळ्याच व्यक्तीरेखांमध्ये एक साम्य आहे, व्याकुळतेचे. तेच या कथांचे सूत्र आहे. त्यांचे जगणेही वाचकाला अंतर्मुख आणि प्रगल्भ करते. 'आर्तता' ह्या सूत्राभोवती गुंफलेल्या दीर्घकथांचा हा संग्रह आहे. नातेसंबंधांतील विविधता हे ह्यातील कथांचे वैशिष्ट्य. स्त्री-पुरुष नातेसंबंध, स्त्रीची घुसमट आणि स्त्री-स्वातंत्र्य (संक्रमण, बाबाची आई), विवाहबाह्य नातेसंबंध (जन्म), रक्ताच्या नात्यातील माणसांचे आपसांतील नातेसंबंध (श्रध्दा, रूट्स) जन्म-मृत्यू ह्यासारख्या माणसाच्या हातात नसणाऱ्या घटनांमुळे अस्ताव्यस्त होणारे आयुष्य (नातं) अशा नात्यांतील विविधता दाखवणाऱ्या ह्या कथा आहेत. वेगवेगळ्या वयोगटातील स्त्रिया आणि पुरूषांची माणूस म्हणून जगताना होणारी भावनिक आंदोलने ह्यात टिपली आहेत.

नीरजा, प्रज्ञा दया पवार, मनस्विनी लता रवींद्र या समकाळातील महत्त्वाच्या कथालेखिकांनी स्त्री-पुरुष नातेसंबंधातील विविध आयामांचा धांडोळा घेतला. एकाकीपण, तुटलेपण, हतबलता, प्रेम, वासना, भय, मृत्यू, कोंडमारा, लिंगभेद याविषयीचे प्रखर भान त्यांच्या कथांमधून अभिव्यक्त झाले आहे. लिंगभावाची केलेली मांडणी पारंपरिकतेपेक्षा वेगळी आहे. अनुभवद्रव्याला तितक्याच ताकदीने पेलणारी काहीशी असांकेतिक भाषा या लेखिकांनी योजलेली आहे.

एकंदरीत आजची मराठी कथा अनेक सर्जक शक्यता आजमावत आहे. या काळातील कथालेखकांनी प्रचलित संकेतव्यूह झुगारत कथेची संरचना अधिक प्रसरणशील केली आहे. आधीच्या कथेपेक्षा आशय आविष्काराची धाटणी निराळी आहे. या कथाकारांनी मानवी जगण्यातील अंधाऱ्या कोपऱ्यांना उजागर केले. कल्पिताचा सजगपणे वापर केला. वास्तवाचे बहुमुखीपण अधोरेखित करण्यासाठी कथनाच्या विविध पद्धती अवलंबिल्या. या काळातील कथेची भाषा चिंतनशीलतेकडे, वैचारिकतेकडे झुकत असली तरी तिच्यातील दृश्यात्मकताही तितकीच प्रभावी आहे. आशय आणि भाषेचे अनोन्य नाते या कथांमध्ये पाहायला मिळते. कथा हा दुय्यम नाही तर महत्त्वाचा साहित्य प्रकार आहे, एवढी आश्वासकता या काळातील कथेने नक्कीच निर्माण केली आहे.

**संदर्भ :**

१) डहाके वसंत अबाजी, नवसाहित्य व नवसाहित्योत्तर, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती २००१, पृ. क्र. ०२.
२) आपटे वा. गो., मराठी शब्दरत्नाकर, आनंद कार्यालय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९२२, पृ. क्र. ५८९.
३) ठकार निशिकांत, साहित्याचे परिघ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००१, पृ. क्र.१०.
४) तांबे सतीश, समकालीन एक मुलाखत : ऐसी अक्षरे, दिवाळी अंक, प्रहार वृत्तपत्र, १० नोव्हेंबर २०१५, पृ. क्र.०५.
५) कुलकर्णी गो.म., मराठी वाङ्मयाचा इतिहास, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती २००१, पृ. क्र.७२.